भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in

जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ५१५ /पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दिनांकः- २३ /०९/२०१८

# " मारपीठ करणाऱ्या ईसमास सहा महिणे सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा"

पोलीस ठाणे आंधळगाव अंतर्गत मौजा डोंगरगाव येथिल राहणारा जयदेव पांडुरंग सेलोकर याचे मालकीचे जमीनीवर पुतन्या आकाश धनराज सेलोकर याने स्वतःची मालकी असल्याचे दाखवुन जयदेव सेलोकर यांचे सोबत झगडा भांडाण करून मारपीठ केल्याचे आरोप सिध्द झाल्याने दिनांक ५.०९.२०१८ रोजी प्रथम श्रेणी न्यायालय मोहाडी चे न्यायाधिश श्री. एस.के. साबळे सा. यांनी आरोपीस सहा महिणे सश्रम कारावास व १००० रुपये द्रव्यदंडाची शिक्षा सुनावली.

याबाबत अधिक माहीती अशी की, जयदेव पांडुरंग सेलोकर यांनी सन १९९१ मध्ये सुखदेव भुरे रा. डोंगरगाव यांचे कडुन खाली प्लॉट विकत घेतला व त्यावर घर व जनावराकरीता कोठा बांधुन उर्वरीत खाली २५३० चौरस फुट जागा हि दैनंदिन वहिवाटी करीता मोकळी ठेवली, मोकळी जागेवर जयदेव सेलोकर यांचा पुतन्या आकाश धनराज सेलोकर रा. वरठी याने आपले मालकीचा प्लॉट असल्याचे दाखवुन बळजगरीने आपली वहीवाट करीत होता व नेहमीच जयदेव सेलोकर यांचे सोबत झगडा भांडण करून मारण्या पिठण्याची धमकी देत असे. दिनांक ३१.१०.२०१७ रोजी जयदेव सेलोकर हे आपले घरी हजर असता आकाश सेलोकर व त्याचा वडील धनराज सेलोकर हे आले व जयदेव सेलोकर याचे मालकीचे खाली प्लॉटची मोजमाप करीत असता जयदेव सेलोकर यांनी सदर प्लॉट मालकी हक्का बाबत सांगत असता आकाश धनराज सेलोकर याने सदर प्लॉट बाबत जयदेव सेलोकर यांचे सोबत झगडा भांडण करून प्लॉटवर पडलेली काठी उचलुन जयदेव सेलोकर यांचे डोक्यावर लाकडी काठीने दोनदा वार केले घटणास्थळावर हजर असलेला जयदेव यांचा मुलगा नरेंद्र सेलोकर व गावातीलच प्रकाश मानकर यांनी आकाश सेलोकर यास अडवुन जख्मी अवस्थेत असलेले जयदेव सेलोकर यांना पोलीस ठाणे आंधळगाव येथे येवुन घटणेबाबत जयदेव सेलोकर यांनी तोंडी तक्रार व वैद्यकीय अधिकारी यांनी जयदेव सेलोकर यांचे शरिरावरील जख्मांचे परिक्षण अहवाल दिलेवरून आरोपी आकाश धनराज सेलोकर यांचे विरूध्द अपराध क्रमांक १२८/१७ कलम ३२४ भा.दं.वि. अन्वये नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचा तपास पो.हवा. राजेश बाभरे यांनी करुन गुन्हयातील आरोपी आकाश धनराज सेलोकर, वय २४ वर्ष रा. वरठी ता. मोहाडी, जिल्हा भंडारा यास तात्काळ कायदेशिर अटक करून गुन्हयात साक्षपुरावा गोळा केला. आरोपी विरुध्द योग्य व सबळ पुरावे मिळुन आल्याने आरोपपत्र प्रथम श्रेणी न्यायालय मोहाडी येथे दाखल केले. सदर आरोपपत्रास केस क्र. ७५/१७ अन्वये सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी **प्रथम श्रेणी न्यायाधिश श्री. सिध्दार्थ के. साबळे सा.** यांचे न्यायालयात चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्रीमती बी.जी. पांडे , सहा. सरकारी अभियोक्ता, प्रथम**

**श्रेणी, न्यायालय मोहाडी** यांनी गुन्हयातील साक्षपुरावा योग्य प्रकारे न्यायालयात सादर करून शासना तर्फे बाजु मांडुन साक्षदार तपासले. दिनांक ५.०९.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरुप व गंभिरता लक्षात घेवुन **आरोपी आकाश धनराज सेलोकर, वय २४ वर्ष** याचे विरुध्द दोषसिध्द झाल्याने **कलम ३२३ भादवि मध्ये सहा महिणे सश्रम कारावास व व १००० रूपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली**. सदर गुन्हयात सहा. पोलीस निरीक्षक, के. व्ही. सोनटक्के, ठाणेदार पोलीस ठाणे आंधळगाव यांचे मार्गदर्शनात पोलीस हवालदार अशोक बावणकर यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

(जितेंद्र के. आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक,
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ०९४०३१०९७२०

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनीधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत**, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.